प्रेसनोट दि. ०९/१०/२०१८

नाशिक राष्ट्रीय महामार्गावर चाकण येथे ए.टी.एम मशीन फोडत असताना गुन्हेगाराला दरोडा प्रतिबंधक विभागाकडुन अटक

oooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooo

दिनांक ०९/१०/२०१८ रोजी पहाटे एका गुन्ह्यातील आरोपी हे चाकण परिसरात असलेबाबतची बातमी श्री समीर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१, पुणे शहर यांना मिळाली. त्या अन्वये श्री.समीर शेख सहा.पोलीस आयुक्त, राजेंद्र कदम वरिष्ठ पोलीस निरीक्षक व दरोडा प्रतिबंधक पथकातील अधिकारी, कर्मचारी यांनी चाकण परिसरात शोध घेवुन परत येत असताना पहाटे ०३/०० वा चाकण येथे राष्ट्रीय महामार्गावर त्यांच्या पोलीस वाहनांना पाहुन ॲक्सीस बँकेच्या ए.टी.एम. मधुन तीन लोक तोंडाला फडके बांधुन बाहेर पळताना दिसले. त्यांच वेळी ग्राम सुरक्षा दलाचे दिनेश सांगडे, प्रकाश ढोले, दिपक कुमार हे तेथे आले व ते एका इसमाच्या मागे पकडण्यासाठी धावले व वपोनि, राजेंद्र कदम, सपोनि लक्ष्मण ढेंगळे, पो हवा अजय थोरात, पो ना वैभव स्वामी, पो ना सचिन गायकवाड, चालक पो हवा धनाजी पाटील हे त्यांतील दुसरे इसमाचे पाठीमागे पळुन पाठलाग करुन पकडले. त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांने त्याचे नाव चेतन शिवाजी राऊत, वय-२५ वर्षे, रा.चाकण, पुणे असे सांगुन त्यांने व त्याच्या दोन साथीदारांनी मिळुन ॲक्सीस बँकेचे ए.टी.एम.फोडल्यांचे सांगीतले. त्यांच वेळी सदर ठिकाणी चाकण पोलीस ठाणेचे रात्र गस्तीसाठी असलेले पोलीस उप निरीक्षक, व्ही सी पासलकर व पोलीस शिपाई खेडकर हे आले. त्यांचे समवेत ए.टी.एम.ची पहाणी केली असता पहारीच्या सहाय्याने ए.टी.एम मशिन फोडल्यांचे दिसले. तसेच त्या ए.टी.एम. बाहेर एक पांढ-या रंगाची नंबर नसलेली मोटर सायकल व एक रंगाचा स्प्रे मिळुन आला. सदरचे ए.टी.एम.मशिन फोडणारे पाठलाग करुन पकडलेले आरोपींस पुढील कार्यवाहीसाठी रिपोर्टासह चाकण पोलीस स्टेशनकडे वर्ग करण्यात आले आहे.